सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 427 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 09 / 11 / 2025

# 1)घरफोडी :–

**अर्धापूर :–** दिनांक 05.11.2025 रोजी 10.00 ते दिनांक .08.11.2025 रोजी 08.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी गणपतराव देसाई नगर अर्धापूर ता.अर्धापूर येथे,** घराचे कुलुप कोंडा तोडून आत प्रवेश करून कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकुण 2,85,300/– रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी माधवराव लक्ष्मण गाडे, वय 35 वर्षे, रा. गणपतराव देसाई नगर अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 649/2025 कलम 305(क),331(3),331(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/भोसले मो. नं. 8888721800** हे करीत आहेत.

# 2)जबरी चोरी :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 06.11.2025 रोजी रात्री 01.00 वा.चे सुमारास, **सदगुरू फायनान्सचे समोर नांदेड येथे,** आरोपी नामे दिपू महाराज उर्फ रनदिप सिंग, 2.बंटी सोळंके, 3.निखिल सोळंखे, यांनी संगनमत करून फिर्यादीस तुम्ही आमच्याकडे काम का करत नाहीत असे म्हणून शिवीगाळ करून थापड बुक्यानी मारहाण करून खिशातील नगदी 8,000/–रू. जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शेख इरशाद मुस्तफा, वय 33 वर्षे, रा. मगदुम नगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 411/2025 कलम 119(1),352,351(2),(3),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/हुसैन, मो. नं. 9823222134** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :–

**वजिराबाद :–** दिनांक 08.11.2025 रोजी 07.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घरी पुंडलीक वाडी नांदेड येथे,** यातील आरोपी नामे अश्विनी वेदराज नांदेडकर, वय 45 वर्षे, रा.पुंडलीक वाडी नांदेड हिने यातील फिर्यादीस येथे भांडी का धुवत आहेस असे म्हणून मानेला धरून फरशीवर लोटून देवून पायास गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी इंदिरा विष्णुपंत नांदेडकर, रा. पुंडलीक वाडी नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 459/2025 कलम 117(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/बोयने, मो.नं. 9767619191** हे करीत आहेत.

# 4)चोरीचा प्रयत्न :–

**हिमायतनगर :–** दिनांक 08.11.2025 रोजी रात्री 01.40 वा. चे सुमारास, **नारायण नगर हिमायतनगर ता. हिमायतनगर येथे,** आरोपी नामे श्रावण राजाराम आगीरकर, रा. धानोरा ता. हिमायतनगर हा फिर्यादीचे घराचे मेनगेट वरून आत येवून दार ढकलुन चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी संतोष गणपतराव आलेवाड, वय 40 वर्षे, रा. नारायण नगर हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 252/2025 कलम 303(2),62 बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव, मो.नं. 9850493110** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड